## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ ची साक्ष

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – विजय कुमार गंगाराम अल्लमवार, वय – ४४ वर्षे,

व्यवसाय – नोकरी, मोटार वाहन निरीक्षक

रा. – सध्या ने. आर.टी.ओ.ऑफिस, यवतमाळ

## शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एम.जी.काळदाते यांचे मार्फत.

०१. दि.२१/१०/२०२२ रोजी मी सिंधुदुर्ग आर.टी.ओ. ऑफिस येथे मोटार वाहन निरीक्षक म्हणून नेमणुकीस होतो. त्या महिन्यात मी वायूवेग पथकात होतो. विजयदुर्ग पोलीस स्टेशन मार्फत आमच्या ऑफिसला वाहन तपासणीबाबत एक पत्र आले होते. मी वायूवेग पथकात असल्यामुळे माझ्याकडे सदरचे वाहन तपासणीचे काम आले. आता मला दि.२१/१०/२०२२ रोजीचे विजयदुर्ग पोलीस स्टेशनचे बिनतारी संदेश दाखवला. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येते. दि.२७/१०/२०२२ रोजी मी विजयदुर्ग पोलीस स्टेशनमध्ये गेलो. पोलिसस्टेशनच्या आवारामध्ये एक टाटा सुमो व एक मोटारसायकल होती. मी दोन्ही गाडयांची तपासणी केली. त्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र दिले. आता मला टाटा सुमोचे प्रमाणपत्र दाखवले. ते तेच असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येते. गाडी क्र. एम.एच.०६-डब्ल्यू- ६३४९ ही टाटा सुमो गाडीची तपासणी केल्यावर ती गाडी चालविण्यास योग्य अशी होती असे मला आढळले. त्या गाडीचे ब्रेक चांगल्या स्थितीत होते. त्या गाडीचे टायर मूळचेच होते. गाडी सुस्थितीत व चालवण्याच्या स्थितीत होती. आता मला मोटारसायकलचे प्रमाणपत्र दाखवले. ते मीच दिले होते. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येते. मोटारसायकलची तपासणी केली असता तिचा क्र.एम.एच.०८-ए.एम-५०९८ असा होता. सदरची गाडी देखील सुस्थितीत होती. या दोन्ही गाडयांमध्ये कोणत्याही प्रकारचा तांत्रिक दोष नव्हता.

सरतपास पूर्ण.

## आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञा श्रीम .एस.एस.कालेकर यांचे मार्फत.

०२. मी साडेतीन वर्षापासून सिंधुदुर्ग येथे काम करत होतो. त्यावेळी नंदकिशोर काळे हे सिंधुदुर्ग जिल्हयाचे उपप्रादेशिक विभाग प्रमुख होते. आमच्या ऑफिसला हालचल रजिस्टर नसते. आम्हाला जिल्हयामध्ये तपासणी करायची असल्यास परवानगी घ्यावी लागत नाही. मला तपासणीबाबत असलेल्या आदेशाचा पुरावा मी पोलिसांकडे दिला नव्हता. मोटार तपासणीचे ज्ञान

असल्याबाबतचा कोणताही पुरावा मी पोलिसांना दिला नाही. ऑफिसला पत्र २१ तारखेला आले होते. मला त्याच दिवशी ते पत्र आल्याबाबत कळविण्यात आले होते. हे खरे की, टाटा सुमो गाडीचा ब्रेक लावल्यावर लगेच ती गाडी आहे त्याठिकाणी थांबू शकते.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-
(श्रीमती एन.बी.घाटगे)
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड

दि. १८/०३/२०२५